Rotary

THE MAGIC OF ROTARY

# रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी

R.I.D. 3132 I Club No. 225665 I Charter Date 02 Oct. 2023

# इंद्रधनु

ISSUE No. 02

PUBLISHED DATE : August 2024



**Rtn. STEPHANIE A. URCHICK**
R. I. President



**Rtn. Dr. SURESH SABOO**
Dist. Governor



**Rtn. POONAM DEODAS**
Assistant Governor



**Rtn. AMOL RATNAPARKHI**
President



**Rtn. ABHIJIT BANE**
Secretary



**Rtn. ABOLI BANE**
Editor

# Message from the **DISTRICT GOVERNOR**



प्रिय मित्रांनो,

तसे मी ३८ वर्षांपूर्वी रोटरीत आलो. मला हळूहळू जाणवले समाजासाठी, स्वेच्छेने, समाधानाने व सेवाभावाने कार्य करणारी ही संघटना आहे. येथे असलेल्या फोर-वे-टेस्टने मला प्रामाणिकपणे काम करण्याची प्रेरणा नव्याने मिळाली. पुढे रोटरीत नवनवीन जबाबदाऱ्या स्वीकारत गेलो. गरीब व गरजू लोकांसाठी काम करत गेलो. गरजू लोकांची जीवन जगण्याची इच्छा टिकून ठेवणारे कार्य करणे, यासारखा दुसरा आनंद नाही. तो मी अनुभवत होतो. पुढे जाऊन अजून एक मोठी जबाबदारी माझ्यावर आली. प्रांत ३१३२ च्या २४-२५ वर्षासाठी गव्हर्नर म्हणून माझी निवड झाली. आपल्या सर्वांच्या विश्वासास पात्र ठरण्याची आता माझी जबाबदारी आहे. तसे हे एक प्रातिनिधिक नेतृत्व आहे असे मी मानतो. खरे तर आपण सर्वजण मिळून एकत्रितपणे एका नवीन प्रवासाला सुरूवात करत आहोत. आपण हा क्षण मोठ्या मनाने व खुल्या दिलाने स्वीकारूयात. या प्रवासाला आपण घेर्याने, दृढनिश्चयाने आणि सौहार्दाने सुरूवात करूयात. आणि आपण हे लक्षात ठेवूया की रोटरीन या नात्याने आपल्यात जगात अर्थपूर्ण बदल घडवून आणण्याची शक्ती आहे. माझ्या मनात खूप मोठा विश्वास, उत्साह आणि आशा आहे की, आपण आपल्या सहप्रवासाला सकारात्मक दिशेने पुढे घेऊन जाऊ. तसे मैत्री, विश्वास, स्वीकृती व स्नेह हे आपल्यातले जुने बंधन आहे. चला नव्याने याला प्रगतिशील किंवा नाविन्यपूर्ण दिशेने घेऊन जाऊयात. नव्या दिशेने केलेला प्रवास तसे बदल घडवून आणेल. बदल अनेकदा अव्हानात्मक देखिल असू शकतो. परंतु तेच वाढ व प्रगतीसाठी उत्प्रेरक देखील असतो. आपण नियोजित केलेले सेवा प्रकल्प सोपे आहेत. पण तेवढेच परिणामकारक देखील आहेत. नवीन मार्ग शोधण्याची आमची वचनबद्धता, काही नावीन्यपूर्ण करण्याची, परिस्थितीशी जुळवून घेण्याची आणि विकास घडवून आणण्याची इच्छा दर्शवते. आपल्याच समुदायात बदल घडवून आणण्यासाठी संधी म्हणून बदल स्वीकारण्याचे आपणास हे अग्रहाचे आमंत्रण आहे. चला या नव्या दिशेने अग्रेसर होऊयात.

आजच्या जगात जिथे आव्हाने अजिंक्य वाटतात, अनिश्चितता मोठी वाटते, तेव्हा 'आशा' हा एक मौल्यवान विचार कामाला येतो. मेंबरशिप वाढवण्याची आशा आहे. फाउंडेशन साठी भरघोस देणगी मिळवण्याची आशा आहे. सर्वच प्रकल्प व ध्येय पूर्ण करण्याची आशा आहे. आपल्या नात्यातील बंधन अधिक दृढ करण्याची आशा आहे. प्रेरणादायी आशावाद व आकांक्षांवर लक्ष केंद्रित करूयात. आपल्या नजरेत आशावादाची ठिणगी तेवत ठेवूयात. चला ही नवीन आशा घट्ट धरून ठेवू कारण पुढे येणाऱ्या अपरिहार्य आव्हानांमध्ये तीच आपल्याला टिकवून ठेवेल.

या नव्या दिशेने व नव्या अशाने पुढे जाण्यासाठी आपल्याला स्वतःवर, एकमेकांवर, आपल्या विचारांवर, दृढ विश्वास असणे गरजेचे आहे. नव्या व सकारात्मक बदलांच्या संभाव्यतेवर व यशावरचा विश्वास टिकवून ठेवावा लागेल. आपण अडथळ्यांवर मात करू शकतो, आपले ध्येय साध्य करू शकतो, आपण ज्यांची सेवा करतो त्यांचे भविष्य उज्वल करू शकतो, हा आपल्याला विश्वास आहे. यासाठी सचोटीने उत्कटतेने व उत्कृष्टतेने सेवा करण्याचे वचनबद्धता ठेवावी लागेल. चला या नव्या दिशेने नव्या अशाने व नव्या विश्वासाने धाव घेऊयात. एकजुटीने एकत्र राहून मोठे स्वप्न साकारुयात.

आपले समर्पण, आपली आवड आणि आपल्या प्रिय असलेल्या रोटरी मूल्यां प्रती, आपल्या अटल वचनबद्धते बद्दल धन्यवाद. एकत्रितपणे, या नवीन सुरूवातीचे, अमर्याद शक्यतांचे आणि अंतहीन प्रभावाचे वर्ष बनवूयात.

आपला स्नेहांकीत,

**रोटे. डॉ. सुरेश साबू**
प्रांतपाल रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२

# Message from the Desk of **ASSISTANT GOVERNOR**



''**नई दिशाएँ, नई आशाएं, नया विश्वास**'' with this encouraging theme we are starting our new Rotary year. I believe that this year too, Rotary will make a positive impact in the well-being of society and this impact will be based on selflessness and dedication.

The district theme ''**नई दिशाएँ, नई आशाएं, नया विश्वास**'' is giving us the opportunity to work on the big budget mega projects which will apparently include all clubs to work together. It will surely make the newbie clubs to feel equally contributed towards society. .. the vision of Rtn Dr. Suresh Saboo, has a vast radii which is covering different medico & non-medico issues of society like cremation sheds, blind free villages, anaemia prevention and many more. So, the mantra that Rotary has given us, the DEI, Diversity, Equity and Inclusion, will be definitely get followed up and resulted in RY 2024-25.

This Rotary year will bring us opportunities to perform, challenges to conquer, lessons to learn, memories to be cherished and outcomes, to be proud upon. .. each one us will be part of this fantabulous journey of togetherness, zeal and accomplishments.

Just a little reminder here to adhere all the time lines and mandates given by RID & RI, which will in turn, help us in discipline maintenance in our clubs. As the Assistant Governor for your club, I will be always there for helping you for doing this task with timely communication and support.

I wish best wishes to the club be the numero uno in all aspects provided by Rotary. Let's gift the world, "The magic of Rotary" !!

Regards

**Rtn. Poonam Deodas**
Assistant Governor - RID 3132

# अध्यक्षीय मनोगत...



प्रिय रोटरी क्लब सदस्य आणि रोटरी मंगळवेढा सिटी परिवार नमस्कार ! रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटीचा प्रेसिडेंट म्हणून आज आपल्याला संबोधित करताना मला अतिशय आनंद होत आहे. आपण सर्वांनी मला २०२४-२५ करिता प्रेसिडेंट म्हणून काम करण्याची संधी दिली व विश्वास दाखवला त्या बद्दल मी आपला सर्वांचा ऋणी आहे. रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी हा क्लब सेवा आणि समाज बांधणी करण्यासाठी नेहमीच अग्रेसर राहिला आहे. त्यामुळे अशा समर्पण भावनेने समाजासाठी काम करणाऱ्या क्लबचे नेतृत्व करण्याची संधी मला प्राप्त झाली हा मी माझा सन्मान समजतो. गेल्या कांही महिन्यांचा प्रवासामध्ये आपण खुप काही साध्य केले आहे.

सर्व्हिस प्रोजेक्ट, निधी संकलन, आरोग्य शिबीरे, मधुमेहला हद्दपार करण्याच्या दृष्टीने या वर्षी आपण ५ हजार लोकांची मोफत मधुमेह तपासणी व ५ हजार महिलांची मोफत हिमोग्लोबीन तपासणी करणार आहोत. अशा अनेक प्रकाल्पांनी हजारों लोकांच्या जिवनामध्ये काहीतरी बदल घडवला आहे. परंतू मित्रांनो हा प्रवास इथेच थांबत नाही हि तर सुरुवात आहे आणि मला खात्री आहे हा प्रवास आपल्या सर्वांच्या सोबतीने पुढे चालूच राहणार आहे.

पर्यावरण, स्वच्छता, वाहतूकिच्या समस्या, विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदत या सारखे अनेक प्रकल्प या वर्षभरात आपण सारे मिळून राबवणार आहोतच. समाजात आपण खूप कांही सकारात्मक बदल घडू शकतो. सर्वात प्रथम रोटरीच्या कार्य व उद्देश समाजा पर्यंत पोहचविणे हे आपले प्रमुख उद्दिष्ठ असणार आहे यासाठी पब्लिक इमेज आणि क्लब बुलेटीनच्या माध्यमातून आपण काही प्रकल्प समाजा समोर आणणार आहोत. त्या सोबतच मेंबरशिप डेव्हेलमेंट साठी देखील आपल्याला मोठे काम करावे लागणार आहे. रोटरॅक्ट व इंटरॅक्ट यांना देखील आपल्या प्रवासा मध्येसोबत घेऊन प्रवास करावयाचा आहे.

R. I. President - Stephanie A Urchick व प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांनी आपल्याला कांही प्रकल्प तसेच या रोटरी वर्षासाठी कांही ध्येय दिली आहे. आपल्या सर्वांच्या सामुहिक प्रयत्नानी आपण ती निश्चितच पूर्णत्वाकडे आहोत.

'मॅजिक ऑफ रोटरी' या थीमने सुरु झालेले हे रोटरी वर्ष 'नई दिशाएँ, नई आशाएँ, नया विश्वास' सोबत घेऊन निश्चितपणे वंचितांसाठी व समाजाच्या उन्नतीसाठी आणि उत्कर्षासाठी आपण करणार असलेले कार्य समर्पित असेल अजून खूप काही बोलायचं आहे, खूप काही करायचा आहे पण आपण हे आपल्या कार्यातूनच सिध्द करुया...

आपला...

**रोटे. अमोल रत्नपारखी**
प्रेसिडेंट २०२४-२५
रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी

# संपादकीय



सर्वप्रथम आपणां सर्वांना रोटरी नववर्षाच्या खुप खुप शुभेच्छा !! २ ऑक्टोबर २०२३ रोजी मंगळवेढ्यात लावलेले हे रोटरीचे रोपटे आज बहरताना आपण पाहतो आहोत. रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी या नवख्या क्लबने अगदी काही महिन्यांच्या अल्प कालावधीत नव्यानेच नावारुपास आलेला Vibrant Club म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. २१ मेंबर्सनी मिळवी सुरु केलेला क्लब आज ३१ मेंबर असलेला क्लब झाला आहे. सर्वच तरुण तडफदार आणि उत्साहि सदस्य या क्लबची धुरा अतिशय उत्तमपणे सांभाळत आहेत याचा मनस्वी आनंद आहे. रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटीने अल्प कालावधीत अनेक उत्कृष्ठ व सांगण्याजोगे प्रकल्प यशस्वीरित्या राबवीले.

रोटरी विश्वात जुलै महिना अत्यंत महत्वाचा मानला जातोकारण या महिन्यातच विविध क्लबचे प्रेसिडेंट व सेक्रेटरी हे पदग्रहण करणार असतात म्हणजेच पदग्रहण सोहळ्यानंतर अधिकृतपणे क्लबचे नेतृत्व त्यांच्याकडे येते. एक वर्षासाठी मिळणाऱ्या अध्यक्षपदाच्या काळात कोण कोणत्या प्रकल्पांवर भर द्यायचा, अंमलबजावणी कशी करायची त्यासाठीचे बजेट कसे उभे करायचे, नवीन संचालकांचे ट्रेनिंग नव-नवे प्रकल्प अशा बहुसंख्ये बाबींचा विचार केला जातो आणि नियोजनबध्द पध्दतीने त्यांची अंमलबजावणी करण्यात येते. रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी ही एक सेवाभावी संस्था एवढ्यापुरतीच या क्लबची ओळख नसून सर्जनशिलता, संवेदानशिलता, मैत्रीपूर्ण व सलोख्याचे बंध निर्माण करणारी समाजभाण जपून समाजामध्ये परिवर्तन घडवण्यासाठी अग्रेसर असणारी सेवाभावी लोकांची संघटना म्हणजेच रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी आहे हे अभिमानाने सांगावे वाटते.

क्लब मधील ॲन्ससुध्दा हिरीरिने प्रत्येक कार्यात आपले बहुमोल योगदान नेहमीच देताना दिसतात. ॲनेट म्हणविणाऱ्या बच्चे कंपनीला देखील बालपणातच सामाजीक कार्याचं बाळकडू मिळत आहे. म्हणजेच उद्याची नवी पिढी देखील सामाजीत कार्याचा आणि देशसेवेचा वसा घेऊनच बाहेर पडेल याची आम्हाला खात्री आहे. स्वतःला रोटेरियन म्हणविणाऱ्या प्रत्येक रोटरी सदस्याला या सेवेतून मिळणारे समाधान हे बहुमोलाचे आहे. आपणा सर्वांच्या मदतीमुळे आम्ही अनेक प्रकल्प यशश्वीरित्या पूर्ण करु शकलो. यासाठी योगदान देणाऱ्या संस्था व दानशूर व्यक्तींचे संपूर्ण क्लब कृतज्ञ आहे. आपले सहकार्य आणि प्रेम आहेच ते अधिकच वृध्दिंगत व्हावे हिच अपेक्षा...

आपल्या क्लबचे नवनिर्वाचीत प्रेसिडेंट रोटे. अमोल रत्नपारखी व सेक्रेटरी रोटे. अभिजीत बने आणि सर्व बोर्ड मेंबर्स यांना रोटरीच्या कार्यासाठी खुप खुप शुभेच्छा !!!

**रोटे. अबोली बने**
एडिटर २०२४-२५
रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी

## मंगळवेढ्यातील महिलांच्या प्रथम पसंतीचे सौंदर्य दालन
# आता नव्या रूपात...




**मंगळवेढ्यातील पहिले अत्याधुनिक व वातानुकूलित लेडीज ब्युटी पार्लर**
हेअर, ब्युटी आणि मेकअप मधील सर्व अत्याधुनिक सुविधा
व ब्युटीमधील नामांकित प्रॉडक्ट्स उपलब्ध !

## HAIR | BEAUTY | MAKEUP




इथे रूप लावण्यमय होते...
सौंदर्याला सुकुमारता येते...



**Lifestyle BEAUTY PARLOUR**

माध्यमिक शिक्षक सोसायटी, ओम जिमच्या मागे,
नर्मदा पार्क, मंगळवेढा. मो.: **9527 241 242**



- सिंगल सिटींग रुट कॅनल
- स्माईल डिझायनिंग ट्रिटमेंट
- शहरात प्रथमच ५ ते १५ वर्ष गॅरंटीच्या मेटल फ्री सिरॅमिक कॅपची सुरुवात
- दात काढणे/अक्कल दाढेची शस्त्रक्रिया
- अत्याधुनिक रोटरी यंत्राद्वारे रुट कॅनल
- पूर्ण फिक्स व काढ-घालावयाची कवळी
- फिक्स/काढ-घालावयाचे दात बसविणे
- अल्ट्रासोनिक यंत्राद्वारे हिरड्यांची/दातांची स्वच्छता
- लहान मुलांचे सर्व दंत उपचार
- वेडेवाकडे दात कॉस्मेटिक पध्दतीने सरळ करणे
- डेंटल इम्प्लांट (दंतरोपण केंद्र)






# बनसोडे
## मल्टिस्पेशालिटी डेंटल क्लिनिक

**डॉ. सचिन बनसोडे**
BDS, डेंटल सर्जन

**डॉ. सौ. प्रियदर्शिनी बनसोडे**
BDS, डेंटल सर्जन

एस.टी.स्टॅन्ड समोर,
खरेदी विक्री संघ साखरेचे गोडाऊन,
मंगळवेढा, जि. सोलापूर.

एस.टी.स्टॅन्ड समोर,
आनंद हॉस्पिटलच्या पाठीमागे,
सांगोला, जि. सोलापूर.

हनुमान चौक, मेन रोड, पटेल शॉपिंग सेंटर,
**बेगमपूर,** ता. मोहोळ, जि. सोलापूर.
**मो.: 9307805767, 9372697995**

## उपलब्ध सुविधा

**डायोड लेसर** : चेहऱ्यावरील अनावश्यक केस ◤ **इक्झायमर लेसर** : कोड ◤ **क्यू स्विच लेसर** : गोंदण ◤ **आय.पी.एल. लेसर** : पिंपल, काळे डाग, वांग ◤ **आयग्रो लेसर** : केस गळतीसाठी ◤ **मायक्रोडर्मअब्रेजन** : स्किन ब्राईटनिंग ◤ **पिलिंग** : चेहरा काळवंडणे ◤ **रेडिओ फ्रिक्वेन्सी** : वार्ट (चामखीळ), मस व तीळ ◤ **मायक्रोनिडल आर.एफ.**: सुरकुत्या, चेहऱ्यावरील खड्डे घालवणे ◤ **हेअर ट्रिटमेंट** : केस गळणे, अकाली केस पांढरे होणे, चाई व कोंडा, कोरडे केस ◤ **यु.व्ही.बी.लाईट थेरपी** : कोड व सोरायसीस ◤ **डर्मारोलर** : चेहऱ्यावरील व्रण ◤ **मिझोथेरपी** : टक्कल ◤ **ॲन्टी एजिंग ट्रिटमेंट** : चेहऱ्यावरील सुरकुत्या ◤ **क्रायोथेरपी** : तारूण्य पिटीका (पिंपल), किलॉईड ◤ **लहान मुलांचे त्वचा आजार** ◤ **आयन्टोफोरेसिस** : हात व पायावरील अतिरिक्त घामासाठी ◤ **पी.आर.पी.**: विरळ केस, न भरून येणाऱ्या जखमांसाठी ◤ **ॲक्युजेल** : डोळ्याभोवतीच्या काळ्या वर्तुळासाठी




मंगळवेढा व्हिजीट : मंगळवेढा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
प्रत्येक सोमवारी दु. २ ते सायं. ५

### डॉ. श्वेता जयंत होलेपाटील
PG Hom. Med. PGDCC, PGDMT
त्वचा, कॉस्मेटोलॉजिस्ट व लेसर तज्ञ



# वैष्णवी
स्किन | हेअर | लेसर क्लिनिक

जयलक्ष्मी रेसिडेन्सी, 3, 328/35 न्यू पाच्छा पेठ, जुना वॉलचंद कॉलेज बॉईस हॉस्टेल जवळ, सोलापूर.
मो.: 9326203399, क्लिनिक : 9326753399, ई मेल : holeypatilshweta18@gmail.com



TAKALE HOSPITAL
BORN TO SERVE

# डॉ. टकले हॉस्पिटल
एस.टी.स्टॅण्डसमोर, इंग्लिश स्कूल परिसर,
मंगळवेढा, जि.सोलापूर. मो.: 9890779917
ई-मेल : borntoserve7799@gmail.com



**डॉ.सौ.अर्चना स. टकले**
BAMS



**डॉ.समाधान तायाप्पा टकले**
BAMS, PGDEMS
(Ruby Hall, Pune)

ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध



**उपलब्ध सुविधा** ◤ ई.सी.जी. मशिन ◤ अल्ट्रासोनिक नेब्युलायझर ◤ मल्टीपॅरा मॉनिटर ◤ सेंट्रल ऑक्सिजन ◤ पल्स ऑक्सिमीटर ◤ रक्त, लघवी तपासणी ◤ रक्तदाब व मधुमेह उपचार ◤ फुफ्फुसाचे विकार, हृदयविकार यावर योग्य उपचार व सल्ला ◤ एक्स-रे ची सोय ◤ दमा, पक्षाघात, झटके येणे ◤ मेडिकलची सुविधा ◤ ॲम्ब्युलन्स सेवा उपलब्ध ◤ २४ तास सेवा उपलब्ध

**आयुर्वेदिक उपचार** ◤ पचना संबंधी सर्व तक्रारी ◤ यकृताचे विकार ◤ आम्लपित्त ◤ मुळव्याध - भगंदर ◤ मधुमेह ◤ हृदय व रक्तवाहिन्यांचे आजर ◤ किडनीचे विकार व मुत्रासंबंधी आजार ◤ पाठीच्या मणक्याचे आजर ◤ संधीवात, आमवात ◤ सांध्यांचे सर्व विकार - गुडघेदुखी ◤ पक्षाघात ◤ जुनाट सर्दी, दमा ◤ उंची वाढविणे ◤ बुद्धी, स्मृती, एकाग्रता वाढविण्यासाठी ◤ स्त्रियांचे सर्व आजार ◤ वंध्यत्व ◤ गर्भाशय व बीजवाहिन्यांच्या तक्रारी सुदृढ व निरोगी अपत्याप्राप्तीसाठी ◤ सौंदर्यविषयक तक्रारी - मुरुमे, पुटकुळ्या ◤ त्वचेचे सर्व विकार ◤ केसांच्या तक्रारी

हिरो कंपनीच्या सर्व प्रकारच्या टु-व्हिलर गाड्यांची विक्री, दुरुस्ती व स्पेअर पार्टस्

Hero

चंगेजखान इनामदार (मेजर)
मो.: 8983602454

महाराजा हॉटेल शेजारी,
**माचणूर** ता. मंगळवेढा.

# माहिम हिरो
## ॲथोराईज्ड सेल्स आउटलेट



उत्तम व दर्जेदार
फुले, फळे व
भाजीपाल्यांची रोपे फक्त
वैभव नर्सरीचेच...



# वैभव
## नर्सरी



आमच्याकडे टोमॅटो, कोबी, फ्लॉवर, वांगी, मिरची, शिमला मिरची,
इत्यादी भाजीपाला रोपे ऑर्डर प्रमाणे तयार करून मिळतील.


आपल्याकडे योग्य
दरात उपलब्ध आहे...

प्रो.प्रा. कुलदिप रजपुत
मो.8182959595/8208444611

Office Mo. 8007024702
Vaibhavnursery700@gmail.com
vaibhavnursary.com

संजय हॉटेल समोर, पंढरपूर रोड, मंगळवेढा ता.मंगळवेढा जि.सोलापुर


SS MOBILE
संत चोखामेळा चौक,
मंगळवेढा
9890213938
iPhone
PER DAY EMI
₹79*
SAMSUNG
Galaxy AI is here
EMI PER MONTH
₹2999
2 YEAR'S
WARRANTY
ON SMARTPHONES


Rotary
THE MAGIC OF ROTARY
रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट
3132 चे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर
सन्माननीय
रोटे.डॉ.
सुरेश साबू
यांचे संतभूमी
मंगळवेढा नगरीत
सहर्ष स्वागत
रोटे.अमोल
रत्नपारखी
प्रेसिडेंट
रोटे.अभिजीत
बने
सेक्रेटरी
सर्व सदस्य व संचालक रोटरी क्लब ऑफ मंगळवेढा सिटी


प्रा. सागर पाटील यांना
राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याबद्दल
हार्दिक शुभेच्छा !
रोटे. प्रा. सागर
पाटील
रोटे. रेणूका
पाटील
शुभेच्छुक : पाटील परिवार, मारोळी




ि· र9िद - स9िद · महागणपित · मं दरासमोर, पंढरपूर रोड, मंगळवेढा, ता. मंगळवेढा, ज. सेलापूर





## उपलब्ध सुविधा

- अमेरिकन दुर्बिद्वारे नेत्र तपासणी
- कॉम्पुटरद्वारे नेत्र तपासणी
- जर्मन दुर्बिणीद्वारे बिनटाक्याची मोतीबिंदू शस्त्रक्रिया
- फेको लेसर मशिनद्वारे मोतीबिंदू शस्त्रक्रिया
- मधुमेह व उच्चरक्तदाब ग्रस्त रुग्णांची विशेष रेटिना नेत्रपटल तपासणी
- डोळ्यांच्या अपघातासंबंधी तातडीचे उपचार
- अत्याधुनिक कॉम्पुटरद्वारे डोळे नेत्र तपासणी
- ZEISS जर्मन दुर्बिणीद्वारे बिनटाक्याचे मोतीबिंदू शस्त्रक्रिया
- फेको (लेसर) मशिनद्वारे मोतीबिंदू शस्त्रक्रिया
- डोळ्यांवर मांस वाढणे, तिरळेपणा, रेटिना, काचबिंदू,
- लासरू इत्यादीवर निदान, उपचार व शस्त्रक्रिया

# वरद नेत्रालय

वेळ : सकाळी 10.30 ते सायंकाळी 6.30
शनिवार सकाळी 10.30 ते दुपारी 2
साप्ताहिक सुट्टी रविवार

**डॉ. नागणे निनाद नारायण**
M.S. (Ayu.) F.G.O., F.C.O.
Fellowship in Comprehensive Ophthalmology
Reg. No. I-66300-A

नेत्ररोग तज्ञ व शल्यचिकित्सक

पहिला मजला, जिजामाता पतसंस्था,
आठवडा बाजार जवळ, शिवप्रेमी चौक,
**मंगळवेढा. मो.: 9142442121**

---

प्रोप्रा. आसिफ मुल्ला
8830344733
9823928890
8275206623



# महेक प्लायवूड अँन्ड जनरल स्टोअर्स

प्लायवूड, हार्डवेअर, फर्निचर व सर्व प्रकारचे फर्निचर मटेरियल योग्य दरात मिळण्याचे ठिकाण

मार्केट यार्ड गाळा नं. १९, उजनी ग्राऊंड समोर, पंढरपूर रोड, मंगळवेढा

---



प्रोप्रा. आसिफ मुल्ला
8830344733
9823928890
8275206623

# अफान फर्निचर

सागवानी सोफासेट, कपाट, शोकेस, टी.व्ही. कॉर्नर इ. सर्व प्रकारचे फर्निचर मिळण्याचे ठिकाण

के.बापूसाहेब पटवर्धन शॉपिंग सेंटर, गाळा नं. १०-११, आठवडा बाजार पेठ, मंगळवेढा

---





# अफान ग्लास सेंटर अँन्ड ॲल्युमिनीयम सेक्शन

मार्केट यार्ड गाळा नं. १९, उजनी ग्राऊंड समोर, पंढरपूर रोड, मंगळवेढा

---

प्रोप्रा. तसनीम अ. मुल्ला
8668563844



# आलिया लेडिज शॉपी

- बॅन्डेड ज्वेलरी
- फॅन्सी साडी व ड्रेसेस
- सर्व प्रकारचे इमिटेशन ज्वेलरी

महेक मंझिल, मित्र नगर, मंगळवेढा.

# Installation Ceremony Memories











# Activities









एक अतुट नातं...

W दOtF· NMण दTMगRTF·...











सुवण´ संचय योजना सु आहे

*िनयम व अटी

## फ" अमोल र पारख च् का ?

िप ।-िप । ा िवै

- ासाच · जपणूक ी
- दा ग ।त ती श9दता व पारदश´कता
- आकष´क डझाईन व भरपूर रायट ी
- यो दर आ ण कमी · मजूर ·
- संपूण´ स टफाईड राशीर
- सुम ो वहा रक मार्गदशन

उ श तटम

- ी
- संपूण´ संगण कक् त वहार
- ाहकोपयोगी · सुविधा
- पारदश´क वहार
- नवनिवन ऑफस´
- नवनिवन उप म ाहकाभिमुख


1901 अ

अमोल रत्नपारखी ज्वेलर्स

साज दागिन्यांचा

चोखामेळा चौक, **मंगळवेढा**, िज. सोलापूर

amol.ratnaprakhi.jewel

https://facebook.com/DealersInGoldSilver

9730625555, 7263995555

amoljewellersmgw@gmail.com